## L. A. BILL No. XIII OF 2023.

*A BILL*

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STATE TAX ON PROFESSIONS, TRADES, CALLINGS AND EMPLOYMENTS ACT, 1975.

## सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३.

**महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९७५ चा १० महा. १६.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे.

(२) तो, १ एप्रिल २०२३ रोजी अंमलात येईल.

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम २७अ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ (यात यापुढे, ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा केला आहे), याच्या कलम २७अ मधील,— १९७५ चा महा. १६.

(१) खंड (क) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(क)(एक) दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ याच्या कलम २ च्या खंड (द) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे लक्षणीय दिव्यांगत्व असणारी कोणतीही व्यक्ती ; किंवा २०१६ चा ४९.

(दोन) लक्षणीय दिव्यांगत्व असणाऱ्या बालकाचे आई-वडील किंवा पालक,

जर, अशा लक्षणीय दिव्यांगत्व असणाऱ्या व्यक्तीने किंवा बालकाने, उक्त अधिनियमाखालील किंवा त्यान्वये केलेल्या नियमांखालील प्रमाणित प्राधिकरणाने दिलेले दिव्यांगत्व प्रमाणपत्र धारण केले असेल तर :

परंतु, अशी व्यक्ती किंवा, यथास्थिति, मालक, ती या खंडान्वये ज्या पहिल्या आकारणी वर्षासाठी सूट मिळण्याचा दावा करीत असेल त्या वर्षासंबंधात विहित प्राधिकरणाकडे उपरोक्त प्रमाणपत्र सादर करील :

परंतु आणखी असे की, व्यक्तीने किंवा, यथास्थिति, मालकाने, दिनांक १ एप्रिल २०२३ च्या लगतपूर्वी असलेल्या या कलमाच्या प्रयोजनार्थ, विहित प्राधिकरणाकडे यापूर्वीच प्रमाणपत्र सादर केले असेल तर तिला पुन्हा ते सादर करण्याची आवश्यकता असणार नाही. " ;

(२) खंड (ई) वगळण्यात येईल ;

(३) खंड (ग) वगळण्यात येईल.

**३.** मुख्य अधिनियमाला जोडलेल्या **अनुसूची एक** मधील, नोंद १ ऐवजी, पुढील नोंद दाखल करण्यात येईल :—

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या अनुसूची एक ची सुधारणा.

" १. वेतनदार व मजुरी मिळविणारे—

(एक) पुरुषांच्या बाबतीत, ज्यांचे मासिक वेतन किंवा मजुरी,—

| | |
|---|---|
| (अ) सात हजार पाचशे रुपयांहून अधिक नाही ; | काही नाही. |
| (ब) सात हजार पाचशे रुपयांहून अधिक परंतु दहा हजार रुपयांहून अधिक नाही ; | दरमहा एकशे पंचाहत्तर. |
| (क) दहा हजार रुपयांहून अधिक ; | दरसाल दोन हजार पाचशे हे पुढील पद्धतीने देण्यात येतील :- (अ) फेब्रुवारी महिना वगळता दरमहा दोनशे ; (ब) फेब्रुवारी महिन्यात तीनशे. |

(दोन) स्त्रियांच्या बाबतीत, ज्यांचे मासिक वेतन किंवा मजुरी,—

| | |
|---|---|
| (अ) पंचवीस हजार रुपयांहून अधिक नाही ; | काही नाही. |
| (ब) पंचवीस हजार रुपयांहून अधिक ; | दरसाल दोन हजार पाचशे हे पुढील पद्धतीने देण्यात येतील :- (अ) फेब्रुवारी महिना वगळता दरमहा दोनशे ; (ब) फेब्रुवारी महिन्यात तीनशे. " . |

**उद्देश व कारणे यांचे निवेदन.**

सन २०२३-२४ या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पीय भाषणात अंतर्भूत असलेले प्रस्ताव अंमलात आणण्याच्या हेतूने, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका आणि नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ (१९७५ चा महा. १६) यात पुढील सुधारणा करणे शासनास इष्ट वाटते,—

(क) ज्या महिलांचे मासिक वेतन किंवा मजुरी पंचवीस हजार रुपयांपर्यंत आहे त्यांना प्रदेय असलेल्या व्यवसाय करातून सूट देणे ;

(ख) दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ (२०१६ चा ४९) याच्या तरतुदींच्या धर्तीवर लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींसाठी सूट देण्याची व्याप्ती सुव्यवस्थित व विस्तारित करणे.

२. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक १६ मार्च, २०२३.

**देवेंद्र फडणवीस,**
उप मुख्यमंत्री.

## वित्तीय ज्ञापन

सन २०२३-२४, या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पीय भाषणात अंतर्भूत असलेले प्रस्ताव अंमलात आणण्यासाठी महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ (१९७५ चा महा. १६) याच्या कलम २७अ व अनुसूची एक ची सुधारणा करण्यासाठी हे विधेयक प्रस्तावित केले आहे. हे विधेयक, राज्य विधानमंडळाचा अधिनियम म्हणून अधिनियमित झाल्यावर, राज्याच्या एकत्रित निधीतून आवर्ती किंवा अनावर्ती खर्चाचा अंतर्भाव असणारी कोणतीही तरतूद या विधेयकात नाही.

(शा.म.मु.) एचबी २९५४—३ (४४०–३-२०२३)

**भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ अन्वये राज्यपालांची शिफारस**

(महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग, आदेशाची प्रत)

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ याच्या खंड (१) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, ते महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका नोकऱ्या यांवरील कर (सुधारणा) विधेयक, २०२३ पुर:स्थापनार्थ घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस करीत आहेत.

(शा.म.मु.) एच २९५४—२ (१०२०—३-२०२२)

**सन २०२३ चे वि. स. वि. क्र. १३ महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर विधेयक, २०२३ याचे परिशिष्ट.**

**(महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ यातील उतारे)**

**(सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६)**

**१. ते २७.** * * * *

**२७-अ**. कलम ३ मध्ये आणि या अधिनियमाच्या इतर तरतुदींमध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट— सूट.

(अ) व (ब) * * * *

(क) राज्य शासनाने याबाबतीत केलेल्या नियमामध्ये कायमस्वरुपी अपंगत्व म्हणून विनिर्दिष्ट केलेले आणि शासकीय रुग्ण्यालयात काम करणारा भिषक, शल्यचिकित्सक किंवा नेत्ररोगतज्ञ याने प्रमाणित केलेले आणि अशा व्यक्तींची काम करण्याची किंवा लाभदायक नोकरीत किंवा व्यवसायात कामावर लावण्यासाठीची सर्वसाधारण क्षमता लक्षणीयपणे कमी करण्याचा प्रभाव असलेले शारीरिक कायमस्वरूपी अपंगत्व (अंधत्वासह) असलेली केणतीही व्यक्ती:

परंतु, अशी व्यक्ती किंवा यथास्थिति मालक या पोट-कलमाअन्वये ज्यासाठी वजातीची मागणी करील अशा पहिल्या आकारणी वर्षाच्या संबंधात विहित प्राधिकरणापुढे उपरोक्त प्रमाणपत्र सादर करील :

आणखी असे की, ज्या व्यक्तीने १ एप्रिल १९९५ च्या लगतपूर्वी असतील अशा या पोट कलमाच्या तरतुदीअन्वये यापूर्वीच विहित प्राधिकरणाकडे प्रमाणपत्र सादर केले असेल तिला, शासकीय रुग्णालयाचा काम करणाऱ्या भिषकाकडील, शल्यचिकित्सकाकडील किंवा यथास्थिति नेत्रोपचारतज्ञाकडील प्रमाणपत्र सादर करण्याची आवशकता असणार नाही.

**स्पष्टीकरण** —या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी " शासकीय रुग्णालय " या संज्ञेमध्ये एखाद्या शासकीय विभागाकडून शासकीय कर्मचाऱ्यांच्या वर्गाच्या किंवा वर्गांच्या आणि त्यांच्या कुटुंबातील व्यक्तीच्या वैद्यकीय परिचर्येसाठी आणि उपचारासाठी चालविण्यात येणार पूर्णकालिक किंवा अंशकालिक विभागीय दवाखाना, शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांच्या उपचारासाठी जेथे व्यवस्था केली आहे असे स्थानिक प्राधिकरणाकडून चालविण्यात येणारे रूग्णालय आणि अन्य कोणतेही रूग्णालय, यांचा समावेश होतो ; ] "

(ड) * * * *

" (ई) जी व्यक्ती, याबाबतीत केलेल्या नियमांमध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार बौध्दिक व वाढविषयक विकलांग (मतिमंदता) असेल व ज्यास, शासकीय रुग्णालयात कार्यरत असणाऱ्या मनोविकृतीचिकित्सकाने प्रमाणित केले असेल आणि परिणामी ज्याची नेहमीच्या कामात किंवा लाभप्रद रोजगार किंवा व्यवसायांमध्ये काम करताना, क्षमता लक्षणीयरीत्या कमी होत असेल अशी व्यक्ती आणि अशा व्यक्तीचे माता-पिता किंवा पालक :

परंतु, अशी व्यक्ती किंवा, यथास्थिति, मालक हा, त्याने ज्या वर्षासाठी या खंडान्वये वजावटीची मागणी केली असेल त्या पहिल्या निर्धारण वर्षाच्या संबंधात विहित केलेल्या प्रधिकाऱ्याकडे उपरोक्त प्रमाणपत्र सादर करील.

**स्पष्टीकरण**.—या खंडाच्या प्रयोजनासाठी " शासकीय रुग्णालय " या शब्दप्रयोगाचा अर्थ हा, खंड (क) मध्ये त्याला नेमून दिलेल्या अर्थाप्रमाणेच असेल ; " .

(फ) * * * *

(ग) खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आल्याप्रमाणे शारीरिक अपंगत्वाने पिडीत असलेल्या मुलाचे आई-वडील किंवा पालक.

(एच) * * * *

**२८. व २९.** * * * *

## अनुसूची एक

(कलम ३ पहा)

व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कराच्या दरांची अनुसूची.

| अनुक्रमांक | व्यक्तीचा वर्ग | कराचा दर |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | भाग एक | रुपये |
| १ | वेतनदार व मजुरी मिळविणारे ज्यांचे मासिक वेतन किंवा मजुरी— | |
| | (अ) ७,५०० रुपयांहून अधिक नाही. | काही नाही. |
| | (ब) ७,५०० रुपयांहून अधिक परंतु १०,००० रुपयांहून अधिक नाही. | दरमहा रुपये १७५. |
| | (क) १०,००० रुपयांहून अधिक. | दरसाल रुपये २,५०० हा कर पुढील रीतीने देण्यात येईल- (अ) फेब्रुवारी महिना वगळता दरमहा रुपये २००; (ब) फेब्रुवारी महिन्यात रुपये ३००. |

१अ. * * * *

२. ते २१. * * * *

**टीप**—१. या अनुसूचीत काहीही अंतर्भुत केलेले असले तरी, या अनुसूचीच्या एकापेक्षा अधिक नोंदीमध्ये एखाद्या व्यक्तीचा समावेश करण्यात आला असेल त्या बाबतीत, त्या नोंदीपैकी कोणत्याही नोंदीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कराचा कमाल दर त्याच्या बाबतीत लागू होईल. ही तरतूद अनुसूचीच्या नोंद १६ (चार) ला लागू असणार नाही.

**टीप—**२. अनुसूचीच्या नोंद ८ च्या प्रयोजनांकरिता मागील वर्षाच्या " विक्री किंवा खरेदीच्या उलाढालीवर " व्यवसाय कर ठरविण्यात येईल. जर अशा व्यापाऱ्याच्या बाबतीत, मागील वर्ष नसेल तर, व्यवसाय कराचा दर रु. २,००० इतका असेल. " खरेदीची उलाढाल " किंवा " विक्रीची उलाढाल " या शब्दप्रयोगाला, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ " अन्वये जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल ".

**अनुसूची दोन** * * * *

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३.]**

**[महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक. ]**

**[श्री. देवेंद्र फडणवीस,**
उप मुख्यमंत्री.**]**

**[विधानसभेने दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे. ]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई